श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित,

**यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर**

आणि

**पन्हाळा तालुका विधी सेवा समिती, पन्हाळा**

यांच्या संयुक्त विद्यमाने

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

विधी साक्षरता अभियान अंतर्गत  ऑनलाईन परिसंवाद

 परिसंवादाचे प्रमुख पाहुणे- **माननीय न्यायाधीश श्री. आर.  आर. मावतवाल,**

परिसंवादाचे अध्यक्ष- **प्रो. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर,**

परिसंवादाचे मार्गदर्शक- **माननीय वकील व्ही. ए. पाटील,**

परिसंवादा तारीख- **१०/११/२०२१**

वेळ- **सकाळी १०:०० ते ११:००**

तरी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी खाली दिलेल्या लिंक वर क्लिक करून सदरच्या परिसंवादात सहभागी व्हावे.

परिसंवादात सहभागी होण्यासाठी लिंक-

**http://meet.google.com/spi-frbv-gyh**

सूचना-

१.सर्व विद्यार्थ्यांनी परिसंवादात सहभागी होणे गरजेचे आहे.

२.परिसंवादात सहभागी झाल्यानंतर परिसंवाद पूर्ण होईपर्यंत ऑनलाईन सहभागी असणे गरजेचे आहे.

लिंक पुन्हा एकदा देत आहोत- **http://meet.google.com/spi-frbv-gyh**


श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.
आणि
पन्हाळा तालुका विधी सेवा समिती, पन्हाळा.
यांच्या संयुक्त विद्यमाने
भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त
"विधी साक्षरता अभियान ऑनलाईन परिसंवाद"
प्रमुख पाहुणे
माननीय न्यायाधीश श्री. आर.आर.मावतवाल
न्यायाधीश दिवाणी न्यायालय तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती, पन्हाळा.
शुभेच्छा -- : माननीय आमदार डॉ. विनयरावजी कोरे
अध्यक्ष श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर.
: प्रो. डॉ. वासंती रासम
प्रशासकीय अधिकारी, श्री वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणानगर.
अध्यक्ष - : प्राचार्य, प्रो.डॉ. प्रकाश चिकुर्डेकर
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.
मार्गदर्शक - : ॲड. व्ही. ए. पाटील
दिनांक-१०/११/२०२१. वेळ- स.१०:०० ते ११:००
संयोजन- राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्रसेना
डॉ.सी.आर.जाधव, डॉ.आर.पी.कावणे, कॅप्टन.डॉ.एस.एस.खोत, लेफ्ट.जे.एस. गायकवाड


REC
Dr. Sudhakar Khot
samruddhi panari
Rohan Barge
Dr. Chandrakant Jadhav
92 others
You




सकाळ

# ‘न्याय व्यवस्थेबाबत जनतेला विश्वास वाटावा’

वारणानगर, ता. १२ : भारतीय बँकांवर ज्या पद्धतीने सर्वसामान्य लोकांचा विश्वास आहे, त्याच पद्धतीने सर्वसामान्यांना न्याय व्यवस्था आणि पोलिस यंत्रणा आपली आहे, न्याय आणि पोलिस यंत्रणेला घाबरून न जाता ही व्यवस्था आपल्यासाठी आहे, असा विश्वास जनतेला वाटला पाहिजे, त्याच हेतूने विधी साक्षरता अभियान उपक्रमाचे आयोजन केल्याचे न्यायाधीश आर. आर. मावतवाल यांनी येथे सांगितले. येथील यशवंतराव



परिसंवादात बोलताना न्या. आर. आर. मावतवाल.

चव्हाण वारणा महाविद्यालयांत स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विधी साक्षरता अभियान उपक्रमांतर्गत झालेल्या ऑनलाईन परिसंवादात १०० विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. आमदार डॉ. विनय कोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम यांनी शुभेच्छा दिल्या. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर अध्यक्षस्थानी होते. न्या. मावतवाल म्हणाले, ‘‘कायद्याचे ज्ञान अखंड भारत वर्षातील सर्वच नागरिकांना असणे गरजेचे असून केवळ अज्ञानामुळे अनेक लोकांची फसवणूक होते आणि अनेक गुन्हे नकळत घडतात असे त्यांनी सांगितले. तरुणांनी तारुण्यातील आकर्षणाच्या मागे न धावता मैत्रिपूर्ण संबंध ठेवायला पाहिजेत; परंतु तरुण-तरुणींमध्ये मैत्रीवर विश्वास ठेवता येईल, असे मित्रत्वाचे नाते राहिले नसल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. सी. आर. जाधव यांनी संयोजन केले. कॅप्टन डॉ. एस. एस. खोत यांनी संयोजन साहाय्य केले, तर डॉ. आर. पी. कावणे यांनी आभार मानले.

Kolhapur, Main
13/11/2021 Page No. 7

# घटना अभ्यासून कायदे समजून घ्यावेत : न्यायाधीश मावतवाल

## वारणा महाविद्यालयात ऑनलाईन व्याख्यान

प्रतिनिधी
वारणानगर

तरुणांनी मैत्रिपूर्ण संबंध ठेवले पाहिजेत. परंतु तरुणाईमध्ये मैत्रीवर विश्वास ठेवता येईल, असे मित्रत्वाचे नाते राहिलेले नाही. भविष्याचा विचार करता तरुणांनी कोणत्याही प्रकारचा गुन्हा करता कामा नये, अन्यथा भविष्यच अडचणीत येऊ शकते, त्यासाठी कायदे समजून घ्यावेत, असे आवाहन पन्हाळा न्यायालयाचे न्यायाधीश, विधी सेवा समितीचे अध्यक्ष आर. आर. मावतवाल यांनी केले.

वारणानगर (ता. पन्हाळा) येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांच्या अध्यक्षतेखाली विधी साक्षरता अभियानांतर्गत आयोजित ऑनलाइन परिसंवादात मावतवाल प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. न्यायाधीश मावतवाल म्हणाले, बँकांवर सर्वसामान्यांचा विश्वास आहे, त्याच पद्धतीने सर्वसामान्यांना न्याय व्यवस्था, पोलीस यंत्रणा आपली आहे, असा विश्वास जनतेला वाटला पाहिजे. त्याच हेतूने विधी साक्षरता अभियानाचे आयोजन केले आहे. कायद्याचे ज्ञान सर्व नागरीकांना गरजेचे आहे. अज्ञानामुळे अनेकांची फसवणूक होते आणि अनेक गुन्हे नकळत घडतात, असे त्यांनी सांगितले.



**वारणानगर : येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना न्यायाधीश आर. आर. मावतवाल.**

डॉ. चिकुर्डेकर म्हणाले, न्याय आणि पोलीस व्यवस्थेबद्दल जनमानसामध्ये आदरयुक्त भीती आहे. समाजातील शेवटच्या, वंचित घटकांना न्याय यातून मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. सी. आर. जाधव यांनी परिसंवादाचे संयोजन केले. ऑनलाइन परिसंवादात १०० विद्यार्थी, प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅप्टन डॉ. एस. एस. खोत यांनी स्वागत केले. डॉ. आर. पी. कावणे यांनी आभार मानले.